# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषद कार्यवृत्तांत
## सोमवार, दि.२१ डिसेंबर, २००९ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सभा सोमवार दि.२१/१२/२००९ रोजी दुपारी १:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. ए. एन. बारबोले | सदस्य |
| ३) | डॉ. बी. बी. कदम, शिक्षण सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर (मा.संचालक (उ.शि.)पुणे यांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| ४) | डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. राजेंद्र एन. शेंडगे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ | सदस्य |
| ६) | प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ७) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ८) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ९) | श्री. एन. बी. पवार | सदस्य |
| १०) | श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्या |
| ११) | प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप | सदस्य |
| १२) | श्री. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १३) | श्री. एन. आर. गरड | सदस्य |
| १४) | श्रीमती एम. एस. कदम | सदस्या |
| १५) | मा. डॉ. डी. जे. साळुंखे -परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १६) | मा. डॉ. डी. डी. पुजारी -वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १७) | मा. कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे, कुलसचिव | सदस्य सचिव |

**स्वागतः**

मा.कुलसचिव यांनी सर्व सदस्यांचे स्वागत करुन सभेस सुरुवात केली.

**अनुपस्थितीः**

ॲड.रामदास पी. सब्बन, श्री. पी. एम. हिरेमठ यांनी दूरध्वनीद्वारे आणि मा. श्री. जयसिंह मोहिते-पाटील यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे याची अध्यक्षांनी नोंद घेतली.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**विषय क्र.१ दि.२१ नोव्हेंबर, २००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१** | **दि.२१ नोव्हेंबर, २००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला.**<br>**१) ठराव क्र.१८ मध्ये, १) मधील "व्याजासह" हा शब्द वगळावा.**<br>**२) ठराव क्र.२०(१) मध्ये, २०(१)(अ) व २०(१)(ब) असे नमूद करावे.**<br>**२०(१)अ) शिवाजी विद्यापीठाचे पत्र संदर्भ क्र.१०२६ दि.३०/०४/०९ या पत्रामधील तपशील अमान्य करण्यात आला.**<br>**२०(१)ब) राज्यमंत्री ...**<br>**३) ठराव क्र.२०(५) मध्ये,**<br>**पूर्वीचा ठराव : "कला व भाषा, मुलींचे वसतिगृह या इमारतीच्या बांधकामाकरीता वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूटअंतर्गत भाववाढीसाठी करण्यात आलेला ठराव फेरविचारार्थ घेता दि.१८/११/२००९ रोजी झालेल्या बांधकाम समितीतील ठराव क्र.५ अन्वये शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली"**<br>**दुरुस्ती**<br>**"कला व भाषा, मुलींचे वसतिगृह या इमारतीच्या बांधकामाकरीता वापरण्यात आलेल्या स्टीलचा विशेष सूटअंतर्गत भाववाढीसाठी करण्यात आलेला ठराव फेरविचारार्थ *घेवून* दि.१८/११/२००९ रोजी झालेल्या बांधकाम समितीतील ठराव क्र.५ अन्वये *केलेली* शिफारस स्वीकारण्यात येवून *विशेष सूटअंतर्गत ठेकेदाराने मागणी केलेली भाववाढ अमान्य करण्यात आली.*"** |

**विषय क्र.२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.०३** **विद्यापीठ लेखी, प्रात्यक्षिक व मूल्यांकन केंद्रावरील महाविद्यालयाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मानधनात १० टक्के वाढ करुन ती ५ ते १० च्या पूर्णांकात करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ स्थापनेपासून शिक्षकेतर सेवकांना परीक्षाच्या कामाकरीता शिवाजी विद्यापीठाच्या परिनियमानुसार मानधन लागू करण्यात आलेले आहे. सोलापूर विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विद्यापीठ परीक्षांच्या कामाकरीता मानधनामध्ये वाढ होवून मिळावी म्हणून वारंवार तोंडी आणि लेखी स्वरुपात मागणी करण्यात येत आहे. तेव्हा विद्यापीठ लेखी, प्रात्यक्षिक आणि मूल्यांकन केंद्रावरील कर्मचाऱ्यांना परीक्षांच्या कामाकरीता प्रचलित दरामध्ये १० टक्के वाढ करुन ती ५ ते १० च्या पूर्णांकात करण्याची बाब परीक्षा विभागाकडील परीक्षा मंडळाच्या दि.२५/०९/२००९ रोजीच्या बैठकीमध्ये आयत्या वेळेचा विषय क्र.९(१) वरील ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे. सदरची शिफारस विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०३** | **विद्यापीठ लेखी, प्रात्यक्षिक व मूल्यांकन केंद्रावरील महाविद्यालयाकडील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रचलित दरामध्ये १० टक्के वाढ करुन रु.५/- च्या पटीत पुढील आंकड्यात रुपांतरीत (ROUND UP) करण्याबाबतची परीक्षा मंडळाची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०४** | **परीक्षक / नियामक (Examiner / Moderator) यांनी केंद्रीय मूल्यांकन केंद्रावर मूल्यांकनाच्या कामासाठी विद्यापीठ आदेशानुसार हजर न झाल्यास रु.१००/- प्रति दिन याप्रमाणे गैरहजर दिवसापासून संबंधित विषयाचे मूल्यांकन संपेपर्यंत दंड आकारणी करण्याबाबत परीक्षा मंडळाची शिफारस विचारार्थ.** |

(टिपणी: विद्यापीठ केंद्रीय मूल्यमापन केंद्रावर परीक्षक / नियामक उत्तरपत्रिका तपासणीच्या कामाकरीता विद्यापीठाच्या आदेशप्राप्तीनंतर बऱ्याच वेळा गैरहजर असल्याचे व विद्यापीठाकडून वारंवार पाठपुरावा करुन देखील वेळेत काम करुन देत नसल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे परीक्षांच्या निकालावर गंभीर परिणाम होत आहेत. अशा परीक्षकांना / नियामकांना उत्तरपत्रिकांच्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर उत्तरपत्रिका तपासणीच्या कामासाठी विद्यापीठ आदेशाप्रमाणे दिलेल्या तारखेस हजर न राहिल्यास रु.१००/- प्रति दिन याप्रमाणे गैरहजर दिवसापासून संबंधित विषयाचे मूल्यांकन संपेपर्यंत दंड आकारण्यात यावा अशी परीक्षा मंडळाने दि.२५/०९/२००९ रोजीच्या बैठकीमध्ये विषय क्र. ९(२) वरील ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली शिफारस विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०४** | **अ) दि.२५/०९/२००९ रोजीच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.९(२) ची शिफारस अमान्य करण्यात आली.**<br>**ब) जे परीक्षक/नियामक विद्यापीठ केंद्रीय मूल्यमापन केंद्रावर मूल्यमापनाच्या कामास अनुपस्थित राहतील किंवा काम अर्धवट सोडून जातील अशा परीक्षक/नियामक यांच्या केसेस परीक्षाप्रमाद समितीकडे पाठवाव्यात.**<br>**क) विद्यापीठ केंद्रीय मूल्यमापन केंद्रावर परीक्षक/नियामक यांना विद्यापीठाचे पत्र मिळूनही ज्या महाविद्यालयांचे प्राचार्य सदर शिक्षकांना वेळेवर सदर कामास कार्यमुक्त करणार नाहीत त्याही केसेस परीक्षाप्रमाद समितीकडे पाठवाव्यात.** |

| विषय क्र.०५ | **Theory Assessment करीता १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- प्रमाणे केलेल्या वाढीमध्ये दुरुस्ती करण्याबाबत परीक्षा मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.** |
|---|---|

(टिपणी: Theory Assessment करीता मानधनामध्ये वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने दि.०७ मार्च, २००९ रोजीच्या बैठकीत व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली होती. सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.३० मार्च, २००९ रोजीच्या बैठकीतील आयत्या वेळेचा विषय क्र. २८(५) नुसार सादर केली असता, त्यावरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

**अ) Theory Assessment १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- वाढीची शिफारस मार्च २००९ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.**

उक्त ठरावानुसार, Theory Assessment करीता १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- वाढ मंजूर करण्यात आलेली होती. परंतू यामध्ये काही तांत्रिक अडचणी येत असल्यामुळे १०० मार्काच्या पेपरसाठी रु.१/- वाढीऐवजी ५० गुणापर्यंत रु.०.५०/- पैसे व ५१ ते १०० गुणांपर्यंत रु.१/- अशी वाढ करण्याबाबत परीक्षा मंडळाने दि.२५/०९/२००९ रोजीच्या बैठकीत विषय क्र.०१ वरील ठरावानुसार व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस विचारार्थ सादर).

| ठराव क्र.०५ | **दि.२५/०९/२००९ रोजीच्या परीक्षा मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.१ ची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

| **विषय क्र.०६** | **पाचव्या दीक्षांत समारंभात ऑक्टो/नोव्हें २००८ व मार्च/एप्रिल २००९ मधील पात्र स्नातकांना पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याची बाब विचारार्थ.** |
|---|---|

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ९६(१) नुसार, पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**The Management Council may institute and confer such Degrees, Diplomas, Certificates and other academic distinctions as may be recommended by the Academic Council.**

या तरतूदीनुसार विद्यापरिषदेने पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे पात्र स्नातकांना प्रदान करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करावी लागते. विद्यापरिषदेच्या दि.१९ डिसेंबर, २००९ रोजीच्या सभेत विषय क्र. ४२ नुसार सदरचा विषय शिफारसीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

पाचव्या दीक्षांत समारंभात ऑक्टो/नोव्हें २००८ व मार्च/एप्रिल २००९ मधील पात्र स्नातकांना पदवी, पदविका, प्रमाणपत्र प्रदान करण्याची विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| **ठराव क्र.०६** | **पाचव्या दीक्षांत समारंभात ऑक्टो/नोव्हें २००८ व मार्च/एप्रिल २००९ मधील पात्र स्नातकांना पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.०७ वर्ग १ मधील सहाय्यक कुलसचिव - १ व उपकुलसचिव - २ या पदनामाची पदोन्नतीची पदे प्रतिनियुक्तीद्वारे (On Deputation) भरण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक **दि.११ मे, २००७** रोजीच्या शासन निर्णयान्वये, या विद्यापीठास १५० शिक्षकेतर पदे मंजूर झालेली होती. सदर पदांची जाहिरात, जाहिरात क्र.०७/२००८ अन्वये विविध वर्तमानपत्रात व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. मा.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) शिक्षण संचालनालय, पुणे यांनी सदरच्या जाहिरातीमधील उक्त पदे सरळसेवेने भरण्याकरिता मंजूरी दिली होती, त्यानुसार सहायक कुलसचिव - ०६ व उपकुलसचिव - ०४ या पदनामाच्या पदांची जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यापैकी एका पदावर सहाय्यक कुलसचिव कार्यरत आहेत.

प्रमाण संहिता नियम १९८४ मधील तरतूदीन्वये, वर्ग १ मधील पदे सरळसेवेने ५० टक्के प्रमाणे व पदोन्नतीने ५० टक्के प्रमाणे भरावयाचे प्रावधान आहे. या अनुषंगाने, सहाय्यक कुलसचिव-०३ व उपकुलसचिव-०२ अशी एकूण ०५ पदे रिक्त आहेत. दि.१९ सप्टेंबर, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रस्तुत विद्यापीठास सुधारित आकृतीबंधानुसार **२१०** शिक्षकेतर पदे मंजूर झालेली आहेत.

सद्यस्थितीत विद्यापीठाची आजअखेरची झालेली जडणघडण, महाविद्यालयांची वाढती संख्या व विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता व विद्यापीठाचे प्रशासकीय कामकाज सुस्थितीत पार पाडण्यासाठी उक्त पदे विद्यापीठात कार्यरत असणे आवश्यक आहे.

सबब, वर्ग १ मधील पदोन्नतीने भरावयाची सहाय्यक कुलसचिव-**१** व उपकुलसचिव-**२** या पदनामाची पदे प्रस्तुत विद्यापीठातील प्रशासकीय सेवक उक्त पदाच्या पदोन्नतीस पात्र होईपर्यंत प्रतिनियुक्तीद्वारे **(On Deputation)** भरण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०७** | **वर्ग १ मधील सहाय्यक कुलसचिव - १ व उपकुलसचिव - २ या पदनामाची पदोन्नतीची पदे प्रतिनियुक्तीद्वारे (On Deputation) नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.०८** **महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्रमांक एसयुएस२००९/(३९०/०९)/विशि-१, दि.१९ सप्टेंबर, २००९ अन्वये, या विद्यापीठास पूर्वीच्या आस्थापनावरील १५० व नव्याने ६० अशी एकूण २१० शिक्षकेतर पदे मंजूर झालेली आहेत. सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

**(सोबत दि.१९ सप्टेंबर, २००९ रोजीचे शासन निर्णय)**

(टिपणी : दि.०६ जुलै, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये पूर्वीची १५० व नव्याने ६० अशी एकूण २१० शिक्षकेत्तर पदे सुधारित आकृतीबंधानुसार मंजूर केलेली आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्या क्र. ०७ अन्वये आकृतिबंधानुसार गटनिहाय मंजूर केलेल्या २१० पदांचा **पदनिहाय सविस्तर प्रस्ताव** शासनास तात्काळ सादर करावा, असे कळविले होते. त्यानुसार विद्यापीठाचे पत्र क्र.सोविसो/आस्था/२००९-१०/३४८६, दिनांक १० सप्टेंबर, २००९ अन्वये २१० शिक्षकेत्तर पदांचा पदनिहाय सविस्तर प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्रमांक **एसयुएस२००९/(३९०/०९)/विशि-१, दि.१९ सप्टेंबर, २००९** अन्वये, या विद्यापीठास एकूण २१० शिक्षकेतर पदे मंजूर झालेली आहेत. अशा आशयाचा शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०८** | शासन निर्णय क्रमांक **एसयुएस२००९/ (३९०/०९)/विशि-१, दि.१९ सप्टेंबर, २००९ आकृतीबंधानुसार २१० शिक्षकेत्तर पदास मंजूरी देण्याबाबतच्या शासन निर्णयाची नोंद घेऊन शासन निर्णयान्वये कार्यवाहीस (नामाभिदान बदलण्यासह) मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र.०९ प्रस्तुत विद्यापीठास पूर्वीच्याच खाजगी कंत्राटदारास मनुष्यबळ पुरविण्यासाठी तीन महिने मुदतवाढ दिल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि. २४ डिसेंबर, २००८ रोजीच्या सभेतील आयत्या वेळेचा विषय क्र. १९(२) वरील ठरावानुसार मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी मे. वर्षा (वीजग्राहक) सेवा या कंत्राटदारास माहे १ जानेवारी २००९ ते ३० नोव्हेंबर २००९ या कालावधीसाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याबाबत पत्र क्र. SUS/UTY/ESTT/९६६८ या आदेशान्वये कळविण्यात येवून सदर कालावधीकरीता करार करण्यात आलेला होता. त्यांचा करार दि.३० नोव्हेंबर २००९ रोजी संपुष्टात आल्यामुळे कार्यालयाकडील दि.२७/१०/२००९ रोजीच्या टिपणीवरील आदेशानुसार मा.कुलगुरु यांनी तीन महिन्यांकरीता सदर कंत्राटदारास मुदतवाढ देण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.०९** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१०** | **विद्यापीठामध्ये मनुष्यबळ पुरविणाऱ्या खाजगी कंत्राटदाराकडून वाढीव ०३ संगणक लेखनिक, ०९ सुरक्षा कर्मी व ०१ वाहनचालक घेण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.** |
| | (टिपणी: विद्यापीठ प्रांगणात नव्याने कार्यान्वित झालेल्या इमारती उदा. मुलींचे वसतिगृह, मुलांचे वसतिगृह, मल्टीपर्पज इमारत इत्यादीसाठी ०३ संगणक लेखनिक, ०९ सुरक्षा कर्मी व ०१ वाहनचालक यांची अत्यंत आवश्यकता असल्यामुळे मनुष्यबळ पुरविणाऱ्या खाजगी कंत्राटदाराकडून घेण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी म. वि. का. १९९४ मधील कलम १४(७) अन्वये केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर). |

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१०** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.११ विद्यापीठ शिक्षक निवड समितीसाठी आचारसंहिता / मार्गदर्शक सूचना महाविद्यालयास अंमलबजावणी करण्यासाठी मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

**(प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०४ पाने जोडली आहेत)**

(टिपणी : व्यवस्थापन परिषदेच्या दि. १० सप्टेंबर, २००९ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ७ नुसार विद्यापीठ निवड समितीसाठी पूर्वीची आचारसंहिता विचारात घेवून अद्यावत आचारसंहिता तयार करण्याचे ठरविण्यात आले.

मा.कुलगुरुसाो यांनी आचारसंहिता / मार्गदर्शक सूचना तयार करण्यासाठी प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप, प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर आणि प्रा. डॉ. ई. एन. अशोककुमार यांची समिती गठीत केली होती. समितीने दि.२४/११/२००९ रोजी बैठक घेऊन आचारसंहिता / मार्गदर्शक सूचना तयार केलेल्या आहेत.

संलग्न महाविद्यालयात मुलाखती चालू असल्याने व नजीकच्या कालावधीत व्यवस्थापन परिषदेची बैठक होणार नसल्याने मा.कुलगुरुमहोदयांनी सदरच्या आचारसंहिता / मार्गदर्शक सूचना यांना व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

विद्यापीठ परिपत्रक क्र. एसओएल/बीसीयुडी/डीएच/५२७०, दि.०२/१२/०९ नुसार आचारसंहिता / मार्गदर्शक सूचना सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविल्या.

मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.११** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१२ प्रा. डॉ. बी. आर. पिरगोंडे, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांच्या तक्रारी अर्जावर तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारसीवर स्टॅट्यूट ३३५ प्रमाणे सुनावणीसाठी व्यवस्थापन परिषदेसमोर सादर.**

**(सोबत पत्राची प्रत जोडली आहे)**

(टिपणी: १. प्रा. डॉ. बी. आर. पिरगोंडे, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.२३/११/२००८ रोजीचा अर्ज सादर केला होता. सदरच्या अर्जावर तक्रार निवारण समितीच्या दि.१५/०५/२००९ रोजीच्या बैठकीमध्ये खालीलप्रमाणे व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली होती.
**"प्रा. पिरगोंडे बी. आर. यांची स्टॅट्यूट २१६ प्रमाणे चौकशी चालू असल्याने व त्यांची सद्यस्थितीत काही तक्रार नसल्याने अर्ज निकाली काढण्यात आला".**

सदरची शिफारस व्यवस्थापन परिषदेने दि.१२/०६/२००९ रोजीच्या बैठकीमध्ये स्टॅट्यूट ३३५ नुसार स्वीकारली. या प्रमाणे दोन्ही पक्षकारांना या कार्यालयाने पत्र क्र. SOL/Grev/१९९८ दि.०१/०७/२००९ अन्वये कळविण्यात आले होते. याबाबत प्रा. पिरगोंडे बी. आर. यांनी दि.०७/०८/२००९ रोजीच्या पत्राने तक्रार केली आहे.

२. वरील दि.१२/०६/२००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करीत असताना दि.१०/०९/२००९ रोजी ठराव क्र. १(९) प्रमाणे **"डॉ. बी. आर. पिरगोंडे यांचे प्रकरण पुनश्चः तक्रार निवारण समितीकडे पाठवावे"** अशी दुरुस्ती करण्यात आली. सबब सदरचे प्रकरण प्रा. पिरगोंडे यांचा दि.०७/०८/२००९ रोजीच्या तक्रारी अर्जासह दि.१६/११/२००९ रोजी तक्रार निवारण समितीसमोर फेर विचारार्थ ठेवण्यात आले असता, तक्रार निवारण समितीने खालीलप्रमाणे शिफारस केली होती.

| | |
|---|---|
| ठराव क्र. २ | दि.१०/०९/२००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेतील ठराव क्र. १(९) प्रमाणे व तक्रारदार प्रा. डॉ. बी. आर. पिरगोंडे यांनी यासंदर्भात दि.०७/०८/२००९ रोजी दिलेल्या अर्जासंदर्भात तक्रार निवारण समितीमध्ये सखोल चर्चा झाली व खालील निर्णय घेण्यात आला. |
| अ) | प्रा. डॉ. बी. आर. पिरगोंडे यांनी दि.१५/०५/२००९ रोजी तक्रार निवारण समिती समोर त्यांची स्वतःची काहीही तक्रार नसल्याचे निवेदन तोंडी केले होते. प्रा. डॉ. बी. आर. पिरगोंडे यांनी दि.०७/०८/२००९ चा तक्रार अर्ज चुकीचा आहे. सदरची तक्रार ही त्यांना विद्यापीठ पत्र क्र.SOL/Grev/१९४८ दि.०१/०७/०९ नुसार कळविल्यानंतर तब्बल एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीनंतर दिल्याने After Thought दिली असल्याचे तक्रार निवारण समितीचे ठाम मत आहे. त्यामुळे सदर अर्ज दप्तरी दाखल करावा. |
| ब) | दि.१५/०५/०९ रोजीच्या तक्रार निवारण समितीने घेतलेला निर्णय कायम करण्यात आला. |

सदरची शिफारस स्टॅट्यूट ३३५ प्रमाणे दि.२१/११/२००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवण्यात आली असता, व्यवस्थापन परिषदेने **"प्रा. डॉ. बी. आर. पिरगोंडे व संबंधित प्राचार्य या दोन्ही पक्षकारांना पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीच्या वेळी सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळवावे व त्याबाबत स्वतंत्र विषय ठेवावा"** असा निर्णय घेतला आहे. याप्रमाणे दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू व्यवस्थापन परिषदेसमोर मांडण्यासाठी पत्र क्र. SOL/Uty/Grev/५३८६ दि.०८/१२/२००९ प्रमाणे कळविण्यात आले आहे.

सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१२** | **(ठराव पुढील पानावर...)** |

(पान क्र.१३ वरील ठराव पुढे चालू...)

ठराव क्र.१२ अ) परिनियम ३३५ अन्वये दोन्हीही पक्षकार सुनावणीस आले असता, त्यांनी आपले म्हणणे लेखी स्वरुपात खालीलप्रमाणे दिले आहे :

मा. व्यवस्थापन कौन्सिल समोर :-

① प्राचार्य डॉ. जी. एल. शिंदे :

डॉ. बी. आर. शिरगोंडे यांना कार्यभारानुसार वेतनमान देण्यात येईल

[illegible]
२१/१२/०९

② मी प्रा. डॉ. शिरगोंडे बी. आर.

मी आजपासून दि. २१/१२/२००९

पासून प्राचार्य व वि. प्रमुख यांनी दिलेल्या कार्यभारानुसार

वेळापत्रक कामकाज करेन व महाविद्यालयाच्या

प्रगतीसाठी मदत करण्याचे वचन देत आहे.

[illegible]

प्रा. शिरगोंडे

[illegible]
२१/१२/०९

[illegible]
२१/१२/०९

[illegible]

ब) सदरचे म्हणणे विचारात घेवून व तक्रार निवारण समितीच्या दि.१५/०५/०९ रोजीची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.



व्यवस्थापन परिषद सभा सोमवार, दि.२१ डिसेंबर, २००९ कार्यवृत्तांत १४/३४

| | |
|---|---|
| **विषय क्र.१३** | **सौ. मिनाक्षी कदम अध्यक्षा, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा यांच्या दि.२३ जून, २००९ च्या पत्रावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

**(सोबत पत्राची प्रत जोडली आहे)**

(टिपणी: दलित मित्र कदम गुरुजी विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाची मान्यता विद्यापीठाने पत्र क्र. SOL/UTY/Affi/१२८८, दि.२५/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये टप्प्याटप्प्याने काढून घेतलेली असून सदरच्या निर्णयावर फेरविचार घेण्याच्या अनुषंगाने सौ. मिनाक्षी कदम यांनी उपरोक्त पत्र सादर केलेले होते.

सदर पत्र दि.०४/०८/२००९ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. या बैठकीत सौ. एम. एस. कदम यांच्या पत्रावर सखोल चर्चा करुन त्यांनी विनंती अमान्य करण्याची शिफारस महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या वतीने व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली.

सबब, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१३** | **अ) सौ. मिनाक्षी कदम अध्यक्षा, शिक्षण प्रसारक मंडळ, मंगळवेढा यांच्या दि.२३ जून, २००९ च्या पत्रान्वये केलेली विनंती अमान्य करण्याची महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**<br>**ब) श्रीमती एम. एस. कदम, व्यवस्थापन परिषद सदस्या यांचे दि.२१/१२/२००९ रोजीच्या पत्राची बैठकीत नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१४ मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्याबाबत सामंजस्य कराराचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत सामंजस्य कराराचा मसूदा जोडला आहे)**

(टिपणी:- मॉडेल कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे हे महाविद्यालय पुणे विद्यापीठाशी संलग्नित असून ए. आय. सी. टी. ई. नवी दिल्ली व पी. सी. आय. नवी दिल्ली यांची मान्यता आहे. सदर महाविद्यालयाने वेगवेगळे कंपाऊंडस् टेस्ट करण्याच्या सेवा पुरवू शकतात असे कळविले होते. सोलापूर विद्यापीठाबरोबर रसायनशास्त्र विभागाशी संबंधित Collaborative Research Work करण्याबाबत उत्सुकता दर्शविली असून याकामी त्यांनी डॉ. एस. जी. येरंडे असिस्टंट प्रोफेसर यांची Key Contact Person म्हणून नियुक्ती केली आहे. सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या दि.१० सप्टेंबर, २००९ रोजीच्या सभेत विषय क्र. १८(१) अन्वये सादर करण्यात आला होता. यावरील ठराव खालीलप्रमाणे आहे.

**मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्यास मान्यता देण्यात आली.**

उक्त ठरावानुसार मॉडेल कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्याबाबत श्री. एरंडे यांनी पाठविलेला सामंजस्य कराराचा मसूदा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१४** | **मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्याबाबत सामंजस्य कराराचा मसूदा दुरुस्तीसह मान्य करण्यात आला.** |

**विषय क्र.१५ शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी नवीन महाविद्यालयासाठी प्राप्त प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीने दि.०५/१२/२००९ रोजी झालेल्या बैठकीत केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत शिफारशी जोडल्या आहेत)**

(टिपणी: शै. वर्ष २०१०-११ साठी प्राप्त झालेल्या नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावांना भेट देवून अहवाल सादर करण्यासाठी प्रत्येक तालुक्याकरीता द्विसदस्यीयछाननी समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. या समित्यांनी शै. वर्ष २०१०-११ करीताच्या नवीन महाविद्यालयांकरीता प्राप्त प्रस्तावातील ठिकाणांना भेटी देऊन अहवाल सादर केले आहेत. छाननी समितीने केलेल्या शिफारसी दि.०५/१२/२००९ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेत विचारार्थ सादर केल्या होत्या. या बैठकीत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने सदर प्रस्तावावर केलेल्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| ठराव क्र.१५ | शैक्षणिक वर्ष २०१०-११ साठी नवीन महाविद्यालयासाठी प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने दि.०५/१२/२००९ रोजी झालेल्या बैठकीत सोबतच्या तक्ता-अ मध्ये विद्याशाखानिहाय महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविलेल्या ४३ प्रस्तावावरील शिफारशी खालील दुरुस्तीसह स्वीकारण्यात येवून शासनास शिफारशी करण्यात येत आहेत. |
|---|---|

| अ. क्र. | संस्थेचे नांव | नियोजित ठिकाण व विद्याशाखा | म. व वि. वि. मं. ची शिफारस | व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|
| १) | सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर, जि. सोलापूर. | कोर्टी जि. सोलापूर अभियांत्रिकी | शिफारस नाही. कारण पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होणार नाहीत. | शिफारस आहे. कारण संस्थेची इमारत, भौतिक सुविधा, निधी इ.बाबी योग्य असल्याने शिफारस आहे. |
| २) | श्रीराम प्रतिष्ठान मंडळ, वडाळा, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर. | वडाळा, ता. उत्तर सोलापूर अभियांत्रिकी | शिफारस नाही. कारण पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होणार नाहीत. | शिफारस आहे. कारण संस्थेची आर्थिक स्थिती उत्तम आहे. इमारत, मैदान, शालेय साहित्य भरपूर आहेत. |
| ३) | सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर, जि. सोलापूर. | केगांव जि. सोलापूर एम.बी.ए. | शिफारस नाही. कारण पुरेसे विद्यार्थी उपलब्ध होणार नाहीत. | शिफारस आहे. कारण संस्थेची आर्थिक स्थिती उत्तम आहे. सर्व सुविधा उपलब्ध आहेत. |

**विषय क्र.१६ शै. वर्ष २०१०-११ करीता नवीन विद्याशाखा, विषय / अभ्यासक्रमांकरीता प्राप्त प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत शिफारशी जोडल्या आहेत)**

(टिपणी: शै. वर्ष २०१०-११ साठी सोलापूर विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन विद्याशाखा, विषयाकरीता प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी दि.०९/११/२००९ रोजी छाननी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीतील निर्णयानुसार प्राप्त झालेल्या नवीन विद्याशाखा, विषय / अभ्यासक्रमांकरीता प्राप्त प्रस्तावावरील ठिकाणांना भेटी देवून अहवाल सादर करण्यासाठी प्रत्येक तालुक्याकरीता द्विसदस्यीय छाननी समित्या गठीत करण्यात आल्या होत्या. या समित्यांनी शै.वर्ष २०१०-११ करीताच्या नवीन विद्याशाखा / विषयांकरीता प्राप्त प्रस्तावांच्या महाविद्यालयांना भेटी देऊन अहवाल सादर केले आहेत. छाननी समितीने केलेल्या शिफारशी दि.०५/१२/२००९ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने सदर प्रस्तावावर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| ठराव क्र.१६ | **शै. वर्ष २०१०-११ करीता नवीन पदवी व पदव्युत्तर विद्याशाखा, विषय/ अभ्यासक्रमांकरीता प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने सोबतच्या तक्ता-ड मध्ये महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविलेल्या २४ अ मधील ९ प्रस्तावावरील शिफारशी खालील दुरुस्तीसह स्वीकारण्यात येवून शासनास शिफारशी करण्यात येत आहेत.** |
|---|---|

| अ. क्र. | संस्थेचे नांव | मान्यता हवी असणारी नवीन विद्याशाखा, वर्ग व विषय | म. व वि. वि. मं. ची शिफारस | व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस |
|---|---|---|---|---|
| १) | हेमुजी चंदेले कॉलेज, शेळगाव (आर), ता.बार्शी, जि.सोलापूर. | विज्ञान (नवीन पदवी स्तरावरील विद्याशाखा), बी. एस्सी.भाग १ | शिफारस आहे. (महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या निर्णयानुसार सदरबाबत व्यवस्थापन परिषदेत अंतिम निर्णय घेण्यात येईल असे ठरले). | शिफारस आहे. कारण शेळगाव पासून ३५ किमी आत विज्ञान, वाणिज्य व कला शाखा नाही. संस्थेची इमारत स्वतःची आहे. आर्थिक परिस्थिती समाधानकारक. त्या भागातील गरीब विद्यार्थी तसेच मुलींच्या शिक्षणाची सोय होईल. |
| २) | सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता. सांगोला, जि. सोलापूर. | विज्ञान (पदव्युत्तर स्तरावरील नवीन विद्याशाखा), एम. फार्मसी भाग १ | शिफारस नाही. (कारण शासन निर्णय क्र. एनजीसी २००९/(३०१/०९) मशि४, दि.२५.०९.०९ च्या मुद्दा क्र. ८(अ) नुसार अटींची पूर्तता केलेली नाही. | शिफारस आहे. कारण अभ्यासक्रमासाठी सर्व सुविधा उपलब्ध आहेत. |
| ३) | वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर. | कला (पदवीव्युत्तर नवीन विषय / अभ्यासक्रम सुरु करणे प्रस्ताव), भूगोल | शिफारस आहे. कारण इमारत, जागा, ग्रंथालय व शिक्षक उपलब्ध आहेत. शिक्षण संस्था चालविण्याचा अनुभव. | शिफारस नाही. कारण शासन निर्णय क्र. एनजीसी २००९/ (३०१/०९)मशि४, दि.२५/०९/०९ च्या मुद्दा क्र. ८(अ) ची पूर्तता केलेली नाही. |
| ४) | वसुंधरा कला महाविद्यालय,सोलापूर. | कला (पदवीव्युत्तर नवीन विषय / अभ्यासक्रम सुरु करणे प्रस्ताव),मराठी | शिफारस आहे. कारण इमारत, जागा, ग्रंथालय व शिक्षक उपलब्ध आहेत. शिक्षण संस्था चालविण्याचा अनुभव. | शिफारस नाही. कारण शासन निर्णय क्र. एनजीसी २००९/ (३०१/०९)मशि४, दि.२५/०९/०९ च्या मुद्दा क्र. ८(अ) ची पूर्तता केलेली नाही. |

| **विषय क्र.१७** | **शै. वर्ष २०१०-११ करीता नैसर्गिक विस्तार व अतिरिक्त तुकड्यांकरीता प्राप्त प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |
|---|---|

**(सोबत शिफारशी जोडल्या आहेत)**

(टिपणी: शै. वर्ष २०१०-११ करीता नैसर्गिक विस्तार व अतिरिक्त तुकड्यांकरीता प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. सदर प्रस्तावांवर पुढील कार्यवाही करण्याकरीता महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस घेणे आवश्यक होते. त्याअनुषंगाने दि.०५/१२/२००९ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेत सदर प्रस्ताव विचारार्थ सादर केले होते. या बैठकीत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने सदर प्रस्तावावर केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.१७** | **शै. वर्ष २०१०-११ करीता नैसर्गिक विस्तार व अतिरिक्त तुकड्यांकरीता प्राप्त प्रस्तावावर महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाने सोबतच्या तक्ता-ब ४६ प्रस्ताव व तक्ता-क १२ प्रस्तावामध्ये महाविद्यालयाच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे केलेल्या शिफारशी स्वीकारण्यात येऊन शासनास शिफारसी करण्यात येत आहेत.** |

## आयत्या वेळेचे विषय :-

**विषय क्र. १८(१) विद्यापीठ अनुदान आयोगाचे करीअर ओरीएन्टेड कोर्स बाबतचे मार्गदर्शक तत्वे (२००७-१२) व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली आहेत)**

**(टिपणीः-** सोलापूर विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या U.G.C. C.O.P. सर्टिफिकेट कोर्ससाठी रु.५०००/-, डिप्लोमा कोर्ससाठी रु.८०००/- व ॲडव्हान्स डिप्लोमासाठी रु.१०,०००/- संलग्नता शुल्क आकारण्यात येते व संलग्निकरण स्थानिक चौकशी समितीच्या शिफारशीनुसार दिले जाते.

तथापि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करीअर ओरीएन्टेड कोर्सच्या मार्गदर्शक तत्वे (२००७-१२) नुसार यु.जी.सी. करीअर ओरीएन्टेड कोर्सना ५ वर्षाचे संलग्निकरण देण्याबाबत व सदर अभ्यासक्रमांना संलग्नता शुल्क न आकारण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वामध्ये नमुद केले आहे.

सदरचा विषय दि.१८ सप्टेंबर, २००९ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विचारार्थ ठेवला असता सदर सभेत ठराव क्र. ८८(६७) अन्वये **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्वान्वये करीअर ओरिएन्टेड अभ्यासक्रमास विद्यापीठाचे संलग्निकरण शुल्क सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करु नये व संलग्निकरण पाच वर्षासाठी द्यावे अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस केलेली आहे.**

**सबब विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).**

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(१)** | **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या करीअर ओरीएन्टेड अभ्यासक्रमास विद्यापीठांचे संलग्निकरण शुल्क सन २०१०-२०११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करु नये व संलग्निकरण पाच वर्षासाठी द्यावे अशी विद्यापरिषदेची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १८(२) कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे या महाविद्यालयाचा अभियांत्रिकी भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराबाबत शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली आहेत)**

टिपणी: कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे, ता. पंढरपूर या महाविद्यालयाने शै. वर्ष २०१० पासून अभियांत्रिकी भाग २ (Civil Engg., Computer Engg., Elect & Tele. Engg., Mech. Engg.) या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव ३१ ऑगस्ट २००९ पर्यंत सादर करणे आवश्यक होते. तथापि ३१ ऑगस्ट २००९ पर्यंत महाविद्यालयाने प्रस्ताव सादर केलेला नाही तथापि महाविद्यालयाने अभियांत्रिकी भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव सादर करण्यास दि.०३/१२/२००९ रोजी परवानगी मागितलेली होती.

नैसर्गिक विस्ताराची बाब असल्याने सदरचा प्रस्ताव विलंब शुल्कासह स्वीकारण्यात आला आहे.

सदरचा प्रस्ताव हा दिनांक ११/१२/२००९ रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाबाबत प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस घेणे आवश्यक होते. तथापि महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची सभा दि.०५/१२/२००९ रोजी संपन्न झाली होती. सदर प्रस्तावाबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु यांची महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये शिफारस घेण्यात आली आहे.

सबब उपरोक्त महाविद्यालयाचा अभियांत्रिकी भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराबाबत शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(२)** | **कर्मयोगी अभियांत्रिकी महाविद्यालय, शेळवे या महाविद्यालयाचा अभियांत्रिकी भाग २ च्या नैसर्गिक विस्ताराबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेवून प्रस्तावाची शिफारस करण्यात येत आहे.** |

**विषय क्र.१८(३) सोलापूर विद्यापीठामध्ये राज्यस्तरीय आविष्कार महोत्सवासाठी तयार करण्यात आलेले अंदाजपत्रकीय तरतुद व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली आहेत)**

टिपणी: सोलापूर विद्यापीठामध्ये राज्यस्तरीय आविष्कार महोत्सवाचे नियोजन करण्यासाठी मा.राज्यपाल कार्यालय यांच्याकडून वित्तीय व्यवस्थापन उपसमितीची नेमणूक पत्र क्र. CS/Ashwamedha/०९/ (६९१२)/२८२३ दि.२१/०८/२००९ प्रमाणे करण्यात आलेली आहे. सदर समितीची बैठक दि.२५/११/२००९ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रकास मा.कुलगुरुमहोदय यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर बैठकीच्या कार्यवृत्तांतास व सुधारीत अंदाजपत्रकास दि.०८/१२/२००९ च्या वित्त व लेखा समितीने मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(३)** | **राज्यस्तरीय आविष्कार महोत्सवासाठी तयार करण्यात आलेल्या अंदाजपत्रकीय तरतूदीबाबत वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय क्र. १८(४)   दि.०८/१२/२००९ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

(टिपणी: दि.०८/१२/२००९ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दि.०८/१२/२००९ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब दि.०८/१२/२००९ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(४)** | **दि.०८/१२/२००९ च्या खरेदी समितीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेल्या शिफारशी खालीलप्रमाणे स्वीकारण्यात आल्या.** |
| **ख.स.वि.क्र.१** | **दि.०२/०९/२००९ रोजीच्या खरदी समितीच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम केल्याची नोंद घेण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.२** | **विषय क्र.१८ (६) अन्वये स्वतंत्र विषय सादर करण्यात आला आहे.** |
| **ख.स.वि.क्र.३** | **विषय क्र.१८ (७) अन्वये स्वतंत्र विषय सादर करण्यात आला आहे.** |
| **ख.स.वि.क्र.४** | **आविष्कार २००९ संशोधन महोत्सवासाठी खालीलप्रमाणे दर करार व खरेदी करण्याची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**<br>**१) मंडप - शिवशंकर मंडप कॉन्ट्रॅक्टर, सोलापूर.**<br>**२) स्मृतीचिन्ह - कला भारती, सोलापूर.**<br>**३) प्रेझेन्टेशन सेट - जे. एम. डिस्ट्रीब्यूटर्स, सोलापूर.**<br>**४) बॅग - गोविंद भूतडा, सोलापूर.**<br>**५) भोजन - धीरज केटरर्स, सोलापूर.** |
| **ख.स.वि.क्र.५** | **TATA Indica (Euro-III) Diesel Engine या मॉडेलचे एक वाहन रु.४, ०७,०००/- या किंमतीस खरेदी करण्याबाबतची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.६(१)** | **श्री. साई केमिकल्स ॲन्ड स्टेशनरी, सोलापूर यांच्याकडून सन २००९-१० या आर्थिक वर्षाकरीता रसायनशास्त्र संकूलाकडील एम.एस्सी. अभ्यासक्रमा-साठी आवश्यक इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक शास्त्रीय उपकरणे खरेदी करण्याची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.६(२)** | **विद्यापीठाकडील ऑडीटोरियम इमारतीसाठी १२ नग व परीक्षा विभागासाठी ०२ नग तसेच अधिकाऱ्यांकरीता ०३ नग असे एकूण १७ नग दोन टनाचे वातानुकूलित यंत्रे मे. अत्रे असोसिएटस्, सोलापूर यांच्याकडून रु.२९,८००/- (including installation charges and taxes) या दराने खरेदी करण्याबाबतची शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.६(३)** | **शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.६(४)** | **विषय क्र.१८ (१४) अन्वये आयत्या वेळचा स्वतंत्र विषय सादर करण्यात आला आहे.** |
| **ख.स.वि.क्र.६(५)** | **विषय क्र.१८ (१५) अन्वये आयत्या वेळचा स्वतंत्र विषय सादर करण्यात आला आहे.** |
| **ख.स.वि.क्र.६(६)** | **शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.६(७)** | **शार्प कंपनीची झेरॉक्स मशीन खरेदी करु नये अशी शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |
| **ख.स.वि.क्र.६(८)** | **खरेदी समितीच्या शिफारशीअन्वये या बैठकीसमोर सादर करण्यात आलेला नाही.** |

**विषय क्र.१८(५) अभियांत्रिकी विद्याशाखेचे उत्तरपत्रिकेचे पुर्नतपासणीच्या पॉझीटिव्ह निकालानंतर परीक्षा फी विलंब शुल्कासह घेण्याची बाब विचारार्थ.**

**(सोबत अभियांत्रिकी विद्याशाखेचे अधिष्ठाता यांचे पत्र जोडले आहे)**

(टिपणीः दि.२१ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत आयत्या वेळेचा विषय क्र.२० (८) मधील खालील मुद्दा क्र. ०१ उपस्थित केलेला होता.
About Examination fee for the students getting positive result after Grievance Redressal (Revalulation) यावर खालीलप्रमाणे ठराव झालेला आहे.

| |
|---|
| **मुद्दा क्रमांक १ बाबत पुढील बैठकीत विषय सादर करावा असे ठरले.** |

उक्त ठरावानुसार, सदरचा विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(५)** | **अ) सर्व विद्याशाखांसाठी त्यांच्या उत्तरपत्रिकेच्या पुर्नमूल्यांकनाचा निकाल पॉझीटिव्ह (Positive) आल्यास त्यांच्या निकालानंतर त्यांचे परीक्षा अर्ज विनाविलंब शुल्कासह स्विकारावे.**<br>**ब) सदर बाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना तयार करण्याबाबत हा विषय परीक्षा मंडळासमोर ठेवावा.** |

**विषय क्र.१८(६) शासन अनुदानातून HOL Infosolution Pvt., Pune यांच्याकडून IBM Server खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.**

(टिपणी: दि.०८/१२/२००९ रोजीच्या खरेदी समितीसमोर उपरोक्त विषय सादर केला असता खरेदी समितीने खालीलप्रमाणे ठराव केला आहे.
**"HOL Infosolution Pvt., Pune यांना IBM Server खरेदीसंदर्भात अधिकच्या सूट देण्याबाबत वाटाघाटीसाठी बोलावून नंतर सदरचा विषय आगामी व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्याची शिफारस करण्यात आली."**

त्यानुसार सदर फर्मला दि.१८/१२/२००९ रोजी वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले. वाटाघाटीनंतरचा तक्ता सोबत जोडलेला आहे. तो कृपया अवलोकनी घ्यावा. तसेच सदर फर्मचे पत्रही सोबत जोडलेले आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| **ठराव क्र. १८(६)** | **शासन अनुदानातून HOL Infosolution Pvt., Pune यांच्याकडून IBM Server खरेदी करण्याबाबत खरेदी समितीने केलेल्या खालील शिफारशी स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** | | |
|---|---|---|---|
| | **IBM Server** | **Rs.1,99,971/-<br>(Rs.2,06,156/-** x 3% discount)** | **New Higher Version & with additional 2% discount Hence Net Price is Rs.1,95,972/-** |
| | **Windows 2003 Server Std.** | **Rs.41,062/-<br>(Rs.41900/-** x 2% discount)** | **Windows 2008 & with additional 2% discount Hence Net Price is Rs.40,241/-** |

****approved by Management Council Vide its Item No.31(4) dt. 12/06/2009.**

**विषय क्र.१८(७) HCL Infosystems Ltd., Pune यांच्याकडून १५० नग संगणक खरेदीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.**

(टिपणी: दि.०८/१२/२००९ रोजीच्या खरेदी समितीसमोर उपरोक्त विषय सादर केला असता खरेदी समितीने खालीलप्रमाणे ठराव केला आहे.

**"HCL Infosystems Ltd., Pune यांना IBM Computer खरेदीसंदर्भात अधिकच्या सूट देण्याबाबत वाटाघाटीसाठी बोलावून नंतर सदरचा विषय आगामी व्यवस्थापन परिषदेच्या सभेपुढे सादर करण्याची शिफारस करण्यात आली."**

त्यानुसार सदर फर्मला दि.१८/१२/२००९ रोजी वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले. वाटाघाटीनंतरचा तक्ता सोबत जोडलेला आहे. तो कृपया अवलोकनी घ्यावा. तसेच सदर फम्र्चे पत्रही सोबत जोडलेले आहे.

सबब उपरोक्त प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| **ठराव क्र. १८(७)** | **HCL Infosystems Ltd., Pune यांच्याकडून १५० नग संगणक खरेदी करण्याबाबत खरेदी समितीने केलेल्या खालील शिफारशी स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** | | |
|---|---|---|---|
| | **HCL Computers** | **Rs.26,404/-<br>(Rs.27,221/- ** x 3% discount)** | **With additional 1% discount & Windows 7 Operating System Hence Net Price is Rs.26,140/-** |

****approved by Management Council Vide its Item No. 31(4) DT. 12/06/2009.**

**विषय क्र.१८(८)** **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी सोलापूर येथे सहसंचालक कार्यालय सुरु करण्याकरीता दोन स्वतंत्र खोल्याची केलेली मागणी पुनश्चः व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत मा. विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे पत्र जोडले आहे)

(टिपणी: मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी त्यांच्या पत्र जा.क्र. विससं/उशि/कोवि/५७८६-८८, दि.१२ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या पत्रान्वये, पूर्वी कार्यरत असलेल्या शिवाजी विद्यापीठाच्या पी.जी. सेंटरमधील म्हणजे रंगभवन येथील जागेत सर्वसोयीयुक्त दोन स्वतंत्र खोल्या सोलापूर येथे सहसंचालक कार्यालय सुरु करण्याकरीता मागणी केलेली होती. यासंदर्भात दि.२१ नोव्हेंबर, २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेत विषय क्र. १३ अन्वये, व्यवस्थापन परिषदेसमोर विषय सादर केला असता, त्यावर खालील ठराव झालेला आहे.

**मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग सोलापूर कार्यालयाकरिता रंगभवन अभ्यासकेंद्राच्या पहिल्या माळयावरील जागा उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**
**तथापि, सहसंचालक कार्यालयास शहरात उक्त जागेची उपलब्धता होत नसल्यास विद्यापीठ प्रांगणात केगांव परिसरात तात्पुरत्या स्वरुपात जागा उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.**

उक्त ठरावानंतर, या कार्यालयाकडील पत्र जा.क्र. सोविसो/आस्था/२००९-१०/५२८८ दि.०३/१२/२००९ अन्वये, मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना रंगभवन येथील त्यांनी मागणी केलेली जागा काही तांत्रिक अडचणीमुळे देता येत नसून त्याऐवजी सामाजिकशास्त्रे संकूलातील दोन खोल्या सर्व सोयीनियुक्त उपलब्ध करुन देत असल्याचे कळविण्यात आले होते.

यानंतर, मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी सामाजिकशास्त्रे संकूलातील दोन खोल्याची पाहणी करणार असल्याचे त्यांचे पत्र जा.क्र. शिससं/उशि/कोवि/६२१९, दि.०७/१२/२००९ रोजीच्या पत्रान्वये कळविले होते व त्यानुसार, मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी दि.१२/१२/२००९ रोजी या खोल्यांची पाहणी केलेली आहे.

पाहणीनंतर मा.विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी त्यांच्या पत्र जा.क्र. शिससं/उशि/कोवि/६३१३-१५ दि.१४/१२/२००९ रोजीच्या पत्रान्वये सामाजिकशास्त्रे संकूलातील दोन स्वतंत्र खोल्याऐवजी पूर्वीच्या पी.जी. सेंटरमधील म्हणजे रंगभवन येथील दोन खोल्या सर्वसोयीनियुक्त मिळण्याबाबत पुनश्चः विचार व्हावा अशी विनंती केलेली आहे.

सबब, मा. विभागीय सहसचांलक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी केलेली विनंती पुनश्चः व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(८)** | **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना सोलापूर येथे सहसंचालक कार्यालय सुरु करण्याकरीता दि.२१/११/२००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर केल्याप्रमाणे सामाजिकशास्त्रे संकूलातील दोन खोल्या सर्व सोयीनियुक्त (विद्युतीकरण, तात्पुरते फर्निचर, टॉयलेट इ.) उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली.** |

**Item No.18(9)** **Electrification of Earth Sciences Building in Solapur University Campus Solapur.**

(Detailed Estimate is enclosed herewith)

The block estimate prepared by P.W.D. Electrical Sub. Division, Solapur was **Rs. 8,91,072/- (Rounded Nine Lakhs)** and verbaly they had agreed to submit the detailed estimate later.

Considering the urgency of the work (forth coming Avishkar Festival) the item was placed before the Building Work's Meeting for consideration of electrification of earth science building costing **Rs.9,00,000** was placed for consideration vide item No.16 dated 18 November 2009.

The resolution of Building Work's Committee as follow.

**ठरावः-** जानेवारी २०१० मध्ये होणा-या अविष्कार महोत्सवासाठी भूशास्त्र संकुल इमारतीचा उपयोग करणे आवश्यक असल्याने रु.९,००,०००/- च्या कामास मंजुरी देवून येणा-या निविदापैकी कमीत कमी दराची निविदा स्वीकारण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना देण्यात यावे अशी शिफारस करण्यात आली.

The recommendations of Building Works Committee were place before Management Council dated 21 November 2009 item No.11 The resolution of Management Council are as follow.

**व्य.प.ठराव ११:- बां.स.ठ**राव क्र.१६ अन्वये शिफारस स्विकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

Since the P.W.D. electrical Sub. Division did not subimtt the detailed estimate for the said work and hence the preparation of detailed estimate was enthrusded to one of panel architect of University, Mr.Shrinivas Kanchi who is also the architect for the said building. They had submitted the detailed estimate costing Rs.14,39,310/-.

**The cost difference of rupees is as follows.**

| Sr.No | Description | Amount |
|---|---|---|
| 1) | Point Wiring for independt Pluge | 86,365 |
| 2) | Point Wiring for Fan | 66,000 |
| 3) | Supplying erecting PVC armored cable | 72,840 |
| 4) | Amount difference in two switches (Piyano & Modular) | 1,50,000 |
| 5) | Independt Pluge for A.C. | 40,635 |
| 6) | Independt Power Pluge for Computer | 19,845 |
| 7) | Metal distribution board, Earthing pit, Triple pole,MCB, CFL street light etc. | 1,03,625 |
| | **Total Rs.** | **5,39,310** |

The tenders invited for the cost **Rs.14,39,310/-** after negotiation for the tender M/S.Avdhoot Electricals, Pune, has quoted 1.5% below the estimated cost of Rs.14,39,310/- is the lowest bidder.

Considering the urgency of work Hon.Vice-Chancellor has accepted the difference of amount of Rs.5,39,310/- on behalf of Building Work Committee. The said difference of amount **Rs.5,39,310/-. (Total Revise Estimate Cost Rs.14,39,310/-)** is placed for consideration.

| Resouliton No.18(9) | **The action taken by Hon'ble Vice-Chancellor on behalf of B.W.C. is noted and Revised estimate of Rs.14,39,310/- is approved for electrification of Earth Sciences Building of Solapur University Solapur.** |
|---|---|

**विषय क्र.१८(१०)** **महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळालेल्या संस्थांच्या शिक्षक निवड समितीवर विद्यापीठाचा प्रतिनिधी व त्यांनी सादर केलेल्या नियमावलीस मान्यता देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०३ पाने जोडली आहेत)

(टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.३० मार्च, २००९ रोजीच्या सभेतील ठराव क्र.०९ नुसार अल्पसंख्यांक दर्जाबाबत कायदेशीर बाबी तपासून विद्यापीठास मार्गदर्शन करण्यासाठी खालील समिती नियुक्त केली होती.

| | |
|---|---|
| १. प्राचार्य श्री. जे. के. बिले | - अध्यक्ष. |
| २. श्री. एन. बी. पवार | - सदस्य. |
| ३. डॉ. पी. जी. मोरे | - सदस्य. |
| ४. श्रीमती एन. व्ही. साठे | - सदस्या. |
| ५. प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप | - सदस्य. |
| ६. प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख | - सदस्य. |

उपरोक्त समितीच्या चार बैठका होऊन अल्पसंख्यांक दर्जा मिळालेल्या संस्थांच्या महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक निवड समितीवर विद्यापीठाचा एक प्रतिनिधी असावा अशी शिफारस व्यवस्थापन परिषदेस सर्वानुमते केली होती.

हा ठराव विद्यापीठाचे कायदा अधिकारी यांच्याकडे अभिप्रायासाठी पाठविला असता त्यांनी सोबत जोडल्याप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

वरील समितीने सुचविलेला ठराव व कायदा अधिकारी यांचा अभिप्राय पाहता विद्यापीठाकडे पूर्वी असलेल्या अल्पसंख्यांक संस्था व नव्याने अल्पसंख्यांक दर्जा मिळालेल्या संस्था यांच्याबाबत धोरणात्मक निर्णय होऊन अल्पसंख्यांक संस्थांच्या शिक्षक निवड समितीवर विद्यापीठाचा प्रतिनिधी असावा किंवा नसावा आणि अल्पसंख्यांक संस्थांनी सादर केलेल्या शिफारशीस मान्यता देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(१०)** | **महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्यांक दर्जा मिळालेल्या संस्थांच्या (Aided & Non-Aided) महाविद्यालयातील प्राचार्य व शिक्षक निवड समितीवर प्रस्ताव प्राप्त महाविद्यालयांसाठी विद्यापीठाचा एक प्रतिनिधी असावा अशी गठीत केलेल्या समितीने केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र.१८(११)** | **श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचा शै.वर्ष २०१०-११ पासून बीसीए भाग ३ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराबाबत शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ .** |

(सोबत तक्ता ब जोडलेला आहे)

**(टिपणी:-** श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा **या महाविद्यालयाने शै.वर्ष २०१०-११ पासून बीसीए भाग ३ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव ३१ ऑगस्ट २००९ पर्यंत सादर करणे आवश्यक होते. तथापि ३१ ऑगस्ट २००९ पर्यत महाविद्यालयाो प्रस्ताव सादर केलेला नाही तथापि महाविद्यालयाने बीसीए भाग३ च्या नैसर्गिक विस्ताराचा प्रस्ताव सादर करण्यास परवानगी मागितलेली होती.**

नैसर्गिक विस्ताराची बाब असल्याने सदरचा प्रस्ताव विलंब शुल्कासह स्वीकारण्यात आला आहे.

सदरचा प्रस्ताव हा दिनांक २१.१२.२००९ रोजी प्राप्त झाला असून सदर प्रस्तावाबाबत प्रथम महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस होणे आवश्यक होते. तथापि महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची सभा दि.०५.१२.२००९ रोजी संपन्न झाली होती. सदर प्रस्तावाबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने मा.कुलगुरु यांची महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये शिफारस घेण्यात आली आहे.

सबब उपरोक्त महाविद्यालयाचा शै.वर्ष २०१०-११ पासून बीसीए भाग ३ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराबाबत शिफारस करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(११)** | **श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा या महाविद्यालयाचा शै.वर्ष २०१०-११ पासून बीसीए भाग ३ या अभ्यासक्रमाच्या नैसर्गिक विस्ताराबाबत महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

| **विषय क्र.१८(१२)** | **वास्तुविशारद पॅनेलवरील वास्तुविशारदांना त्यांनी केलेल्या वास्तुविषयक कामाबाबत द्यावयाचा मोबदला ठरविण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |
|---|---|

(सोबत अहवाल जोडला आहे)

(टिपणीः वास्तुविशारद पॅनेलवरील वास्तुविशारदांना त्यांनी केलेल्या वास्तुविषयक कामाबाबत मोबदला ठरविण्याबाबत दि.३० मार्च, २००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेतील विषय क्र.२३ अन्वये खालील समिती गठीत करण्यात आलेली होती.

१) प्रा. बी. पी. रोंगे - अध्यक्ष.
२) डॉ. पी. जी. मोरे -सदस्य.
३) प्रा. एन. बी. पवार -सदस्य.
४) प्राचार्य जे. के. बिले -सदस्य.
५) प्रा. पी. एम. हिरेमठ -सदस्य.
६) डॉ. एम. एस. शेजूळ -सदस्य सचिव.

सदर समितीने दिलेला अहवाल सोबत जोडला असून तो व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| **ठराव क्र. १८(१२)** | **वास्तुविशारद पॅनेलवरील वास्तुविशारदांना त्यांनी केलेल्या वास्तुविषयक कामाबाबत द्यावयाचा मोबदला ठरविण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल स्वीकारण्यात येवून दुरुस्तीसह मान्यता देण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.१८(१३) विद्यापीठ स्थापनेपासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विद्यापीठातील क्रीडा समन्वयक, विद्यार्थी कल्याण मंडळ संचालक, कार्यक्रम समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना यांचा यथोचित सत्कार करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ स्थापनेपासून अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत विद्यापीठातील क्रीडा समन्वयक प्राचार्य श्री. सुरेश पवार, विद्यार्थी कल्याण मंडळाचे तत्कालीन संचालक श्री. भगवान आदटराव, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक श्री. तुकाराम शिंदे व विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. संजय नवले यांच्या कार्याचा यथोचित सत्कार/गौरव करण्यात यावा ज्यामुळे इतरांना प्रेरणा मिळावी अशी विनंती वाणिज्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एन. बारबोले यांनी केलेली आहे.
सबब, डॉ. बारबोले यांनी केलेली विनंती व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(१३)** | **अ) विद्यापीठाचे प्राचार्य श्री. सुरेश पवार क्रीडा समन्वयक, प्रा. भगवान आदटराव विद्यार्थी कल्याण मंडळाचे तत्कालीन संचालक, प्रा. तुकाराम शिंदे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक व डॉ. संजय नवले विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला. योग्य वेळी त्यांचा यथोचित सत्कार/गौरव विद्यापीठ प्रशासनाने करावा असे ठरले.<br>१) सूचक - डॉ. ए. एन. बारबोले<br>२) अनुमोदन - प्राचार्य श्री. जे. के. बिले** |

**ठराव क्र**

**विषय क्र.१८(१४) महिंद्रा ट्रॅक्टर अर्जून अल्ट्रा-१ मॉडेल.६०५, डीआयए-६० एच.पी.एस. व Dumper type trolley चार चाकी, पल्टी नांगर डबल-४५, पुढील डोझर खरेदी समितीची ठराव क्र.६(४) अन्वये विचारार्थ सादर..**

**(सोबत तौलनिक तक्ता)**

(टिपणीः विद्यापीठाच्या विस्तारासाठी नव्याने संपादित करण्यात आलेल्या जमीनीच्या विकासासाठी ट्रॅक्टर खरेदी करणेबाबत तांत्रिक समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार महिंद्रा ट्रॅक्टर अर्जून अल्ट्रा-१ मॉडेल.६०५, डीआयए-६० एच.पी.एस. व Dumper type trolley चार चाकी, पल्टी नांगर डबल-४५, पुढील डोझर खरेदी करण्याबाबत स्थानिक अधिकृत विक्रेत्याकडून हस्तपोच दरपत्रके मागविण्यात आली होती प्राप्त दरपत्रकानुसार तौलनिक तक्ता खरेदी समितीच्या विचारार्थ ठेवण्यात आला होता याअनुषंगाने खरेदी समितीच्या दिनांक ८ डिसेंबर २००९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.६(४) महिंद्रा ट्रॅक्टर अर्जून अल्ट्रा-१ मॉडेल.६०५, डीआयए-६० एच.पी.एस. व Dumper type trolley चार चाकी, पल्टी नांगर डबल-४५, पुढील डोझर खरेदी बाबत इतर जिल्ह्यातील अधिकृत विक्रत्यांचेही दरपत्रके घेऊन व त्यांच्याशी वाटाघाटी करुन सदरचा विषय आगामी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस करण्यात आली. त्याचप्रमाणे जॉईन डिअर या कंपनीचेही दरपत्रके मागविण्यात यावी अशीही शिफारस करण्यात आली. सबब खरेदी समितीच्या उक्त ठराव विचारार्थ सादर.

**ठराव क्र. १८(१४)** **महिंद्रा ट्रॅक्टर अर्जून अल्ट्रा-१ मॉडेल.६०५, डीआयए-६० एच.पी.एस. व Dumper type trolley चार चाकी, पल्टी नांगर डबल-४५, पुढील डोझर दि.०८ डिसेंबर, २००९ रोजीच्या खरेदी समितीच्या ठराव क्र.६(४) नुसार केलेली शिफारस स्वीकारण्यात येऊन मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र | फर्मचे नाव | तपशील | दर | |
|---|---|---|---|---|
| | | | दरपत्रकात नमूद केलेले दर | वाटाघाटानंतर ठरलेला दर |
| १. | मे.विठ्ठल ऑटोमोटिव्ह केगाव | महिंद्रा ट्रॅक्टर अर्जून अल्ट्रा-१ मॉडेल.६०५, डीआयए-६० | रु.६,९१,००० | रु.६,११,००० |
| २. | - "-"- | Dumper Type Trolly चार चाकी | रु.१,६५,००० | रु.१,६०,००० |
| ३. | - "-"- | पल्टी नांगर डबल-४५ | रु.४९,२०० | रु.४८,००० |
| ४. | - "-"- | पुढील डोझर | रु.७५,००० | रु.७०,००० |
| | | एकूण रुपये | रु.९,८०,२०० | रु.८,८९,००० |

**विषय क्र.१८(१५) JCB-3 DX HDT Model खरेदी बाबत खरेदी समितीचा ठराव क्र.६(५) अन्वये विचारार्थ सादर..**

**(सोबत तौलनिक तक्ता)**

(टिपणीः विद्यापीठाच्या विस्तारासाठी नव्याने संपादित करण्यात आलेल्या जमीनीच्या विकासासाठी **JCB-3 DX HDT Model** खरेदी करणेबाबत तांत्रिक समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशीनुसार **JCB-3 DX HDT Model** खरेदी करण्याबाबत स्थानिक अधिकृत विक्रेत्याकडून हस्तपोच दरपत्रके मागविण्यात आली होती प्राप्त दरपत्रकानुसार तौलनिक तक्ता खरेदी समितीच्या विचारार्थ ठेवण्यात आला होता याअनुषंगाने खरेदी समितीच्या दिनांक ८ डिसेंबर २००९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.६(५) **JCB-3 DX HDT Model** खरेदी बाबत इतर जिल्ह्यातील अधिकृत विक्रत्यांचेही दरपत्रके घेऊन व त्यांच्याशी वाटाघाटी करुन सदरचा विषय आगामी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करण्याची शिफारस करण्यात आली. सबब खरेदी समितीचा उक्त ठराव विचारार्थ सादर.

<table>
<tr><td rowspan="1">ठराव क्र. १८(१५)</td><td colspan="6">JCB-3 DX HDT Model खरेदी समितीचा ठराव क्र. ६(५) नुसार केलेली शिफारस स्वीकारण्यात येऊन मे. सिध्दार्थ ऑटो इंजिनिअरींग प्रा. लि. सोलापूर यांच्याकडून रु.२०,२५,०००/- या दराने JCB-3 DX HDT Model खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.</td></tr>
<tr><td rowspan="4"></td><td rowspan="2">अ. क्र</td><td rowspan="2">फर्मचे नाव</td><td rowspan="2">तपशील</td><td colspan="2">दर</td></tr>
<tr><td>दरपत्रकात नमूद केलेले दर</td><td>वाटाघाटानंतर ठरलेला दर</td></tr>
<tr><td>१.</td><td>मे. सिध्दार्थ ऑटो इंजिनिअरींग प्रा. लि. सोलापूर.</td><td>JCB-3 DX HDT Model</td><td>रु.२१,८३,१५२</td><td>रु.२०,२५,०००</td></tr>
<tr><td></td><td></td><td>एकूण रुपये</td><td>रु.२१,८३,१५२</td><td>रु.२०,२५,०००</td></tr>
</table>

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**